# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.10.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या,**

- विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातल्या 288 मतदारसंघात 7995 उमेदवारांचे 10 905 अर्ज दाखल; आज होणार छाननी
- अखेरच्या दिवशी शक्तीप्रदर्शन करत दिग्गज उमेदवारांचे अर्ज दाखल; उमेदवारी न मिळालेल्यांची कुठे बंडखोरी तर कुठे नाराजी
- धनत्रयोदशी सर्वत्र उत्साहात साजरी; आरोग्याशी संबंधित विविध विकास कामांचं पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण
- ज्येष्ठ लेखिका, समीक्षक प्राध्यापिका डॉक्टर वीणा देव यांचं पुण्यात अल्पशा आजारानं निधन आणि
- महिला क्रिकेटमध्ये न्यूझीलंडविरुद्धची मर्यादित षटकांची 3 सामन्यांची मालिका भारतानं 2-1 नं जिंकली.

**उमेदवारी अर्ज**

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या कालच्या शेवटच्या दिवशी राज्यातील विविध मतदारसंघांमध्ये अनेक दिग्गज उमेदवारांनी आपापले अर्ज दाखल केले. शक्तिप्रदर्शन करत आणि मिरवणुका काढत हे अर्ज दाखल करण्यात आल्यानं बहुतांश ठिकाणी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची गर्दी उसळल्याचं दृश्य पाहायला मिळालं. राज्यातल्या विधानसभेच्या 288 मतदारसंघाच्या निवडणुकीकरता 7995 उमेदवारांचे 10905 अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. आज या सर्व अर्जांची छाननी होणार असून, चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कामठी मतदारसंघातून, तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी साकोलीतून अर्ज दाखल केला.

अहिल्यानगर जिल्ह्यात काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे हेमंत ओगले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. याच मतदारसंघातून विद्यमान आमदार लहू कानडे यांना काँग्रेसनं उमेदवारी

नाकारल्यानं त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. श्रीरामपूर मतदारसंघातून शिवसेनेचे माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

सय्यद इम्तियाज जलील यांनी एमआयएम या पक्षाच्या वतीनं औरंगाबाद पूर्व मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.

धुळे शहर मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल गोटे यांनी, धुळ्याचे विद्यमान आमदार फारुक शाह यांनी एमआयएम पक्षाकडून तर सकल मराठा समाजाच्या वतीने राजेंद्र काळे आणि विनोद जगताप यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले.

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर विधानसभेसाठी निशिकांत पाटील आणि तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभेसाठी माजी खासदार संजय पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शक्ती प्रदर्शन करत अर्ज दाखल केले. सांगली विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाकडून पृथ्वीराज पाटील यांनी शक्ती प्रदर्शन करत अर्ज दाखल केला. मिरज विधानसभेसाठी कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शक्ती प्रदर्शन करत अर्ज दाखल केला.

मिलिंद देवरा यांनी वरळी मतदारसंघातून, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजन तेली यांनी सावंतवाडी मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

अकोला पश्चिम मतदारसंघातून काँग्रेसचे साजिद खान तसंच वंचित बहुजन आघाडीकडून झिशान हुसैन यांनी अर्ज दाखल केला. दिंडोशीतून संजय निरुपम, महाडमधून भरत गोगावले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

सातारा जिल्ह्यात वाई, कराड, कोरेगाव इथंही शक्ती प्रदर्शन करत महाविकास आघाडी तसेच महायुतीच्या  उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

शिवसेनेचे उमेदवार शालेय शिक्षणमंत्री  दीपक केसरकर यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत महायुतीतर्फे सावंतवाडीतून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या भाजपाच्या विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांनी महायुतीच्या उमेदवार म्हणून निवडणूक अर्ज दाखल केला.

उमेदवारीसाठी इच्छुक पण संबंधित राजकीय पक्षाकडून तिकिट न मिळाल्याने नाराज झालेल्या काही उमेदवारांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले. ऐरोली विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे विजय चौगुले यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. या ठिकाणी महायुतीच्या वतीने गणेश नाईक यांना उमेदवारी जाहीर झाल्याने चौगुले यांनी अपक्ष निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे.

पालघरमधे निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक श्रीनिवास वनगा यांनी माध्यमांसमोर नाराजी व्यक्त केली. काल संध्याकाळपासून ते बेपत्ता झाले असल्याचं आमच्या पालघरच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पोलीस वनगा यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, भाजपाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी

बोरीवलीतून, माजी आमदार अतुल शहा यांनी मुंबादेवी तर घाटकोपर पूर्वमधून भाजपाच्याच प्रकाश मेहता यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला.
पुण्यातही भारतीय जनता पार्टीला नाराज नेत्यांची समजूत काढावी लागली. वडगाव शेरी मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेल्याने नाराज झालेले जगदीश मुळीक, कसबा विधानसभा मतदारसंघात भाजपाने हेमंत रासने यांना उमेदवारी दिल्यानंतर नाराज असलेले भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे तसंच पर्वती मतदारसंघातून इच्छुक असलेले श्रीनाथ भिमाले यांच्याशी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी संवाद साधून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.
नवाब मलिक यांनी मानखुर्द शिवाजीनगर इथून अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला होता. मात्र, नंतर आपल्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून एबी फॉर्म मिळल्यानं आता पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढवत असल्याचा दावा नवाब मलिक यांनी केला आहे.

**मोदी**

आयुर्वेदाला आधुनिक वैद्यकशास्त्राशी जोडल्यामुळे  आरोग्य क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला असून आता आयुर्वेद क्षेत्रात नवं संशोधन होईल," असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. धन्वंतरी दिन आणि नवव्या आयुर्वेद दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आरोग्याशी संबंधित सुमारे 12 हजार 850 कोटी रुपयांच्या योजनांचा प्रारंभ पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. "ज्या देशाचे नागरिक निरोगी असतात त्या देशाची प्रगती वेगानं होते. प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर रोगाचं निदान, मोफत आणि स्वस्त उपचार, छोट्या शहरांमध्ये डॉक्टरांची कमतरता दूर करणं आणि आरोग्य सेवेत तंत्रज्ञानाचा विस्तार हे आरोग्य धोरणाचे पाच स्तंभ केंद्र सरकारने ठरवले आहेत," असंही पंतप्रधानांनी सांगितलं.

**धनत्रयोदशी**

देशभरात दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजेच धनत्रयोदशी काल उत्साहानं साजरी करण्यात आली. याच दिवशी आयुर्वेद दिनही साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त काल वैद्यकीय क्षेत्रातील अनेकांनी धन्वंतरींची पूजा केली. नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठातही  काल राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विद्यापीठ प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशव्दाराजवळ भगवान धन्वंतरीचं कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आलं. जागतिक आरोग्यासाठी आयुर्वेदातील नवोन्मेष अशी यावर्षीच्या धन्वंतरी दिनाची मध्यवर्ती संकल्पना होती; याबाबत अधिक माहिती देताना वैद्य नचिकेत वाचासुंदर म्हणाले .......

**वीणा देव निधन**

मराठीतील ज्येष्ठ लेखिका आणि समीक्षक प्राध्यापिका डॉक्टर वीणा देव यांचं काल पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. त्या 75 वर्षांच्या होत्या. गेले काही दिवस त्या आजारी होत्या. वीणा देव या ज्येष्ठ इतिहास अभ्यासक आणि लेखक गो. नी. दांडेकर यांच्या कन्या तर अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिव देहावर काल रात्री पुण्याच्या वैकुंठ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. पुण्यातील शाहू मंदिर महाविद्यालयात त्यांनी मराठी विभागप्रमुख काम केलं. ‘मराठी कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपे’ या विषयावर सादर केलेल्या प्रबंधासाठी त्यांना पीएच.डी. ही पदवी मिळाली. लेखन, संकलन आणि संपादन हे साहित्याचे विविध प्रकार त्यांनी लीलया हाताळले असून, या संदर्भातील त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'कधीकधी', 'परतोनी पाहे', 'स्त्रीरंग', 'विभ्रम' हे त्यांचे लेखसंग्रह वाचकप्रिय आहेत. त्यांनी गो. नी.दांडेकर यांच्यावर लिहिलेल्या 'आशक मस्त फकीर' या व्यक्तिचित्राला महाराष्ट्र शासनातर्फे उत्कृष्ट ललित साहित्य निर्मितीचा पुरस्कार मिळाला होता.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारतीय संघानं न्युझीलंडविरुद्धची मर्यादित षटकांची मालिका 2-1 नं जिंकली आहे. अहमदबाद इथं झालेल्या कालच्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात भारतानं न्यूझीलंडवर 6 खेळाडू राखून विजय मिळवला. न्यूझीलंडनं दिलेलं 233 धावांचं लक्ष्य भारतीय संघानं 4 खेळाडू गमावत 43 व्या षटकातच पूर्ण केलं.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**